# गोळेगावच्या शेतमजुरांची ससेहोलपट

व. द. भाले

गोळेगाव—( जि. परभणी-औंढा नागनाथ ता) येथे अदाजे १७५ एकरांचा सरकारी र्म आहे. १९५९ साली ती जमीन सरते केवळ- १५०-१७५ रु. एकरप्रमाणे रात घेतली. त्याच जमिनीचे मालक, मजूर म्हणून तेथेच रोजंदारीने काम करू ले. स्त्री-पुरुष असे तेथे १५० मजूर आहेत. हा फार्म सरकारने परभणी कृषी विद्याठाकडे वर्ग केला. त्यांना प्रत्येकी ५ रु. ज मजुरी मिळते. त्यात गेल्या तेवीस वर्षात णतीही वाढ नाही. कृषी विद्यापीठातील र मजूर कायम होऊन त्यांना पगारवाढ झाली. येथील मजुरांना तीही सवलत कारण्यात आली. येथील मजुरांची एक ती संघटना आझाद नावाचे लाल निशाण टाचे कार्यकर्ते चालवीत असत, पण त्यांनी : महिन्यास येऊन माणशी १ ते ३ रु फी वळण्यापलीकडे काही केले नाही. लेबर ऑफिसरांनीही सरकारच्या वतीने, सरकारी जुरांवर होत असलेल्या अन्यायाकडे दुर्लक्षच ले.

औंढा येथील राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते एक तडफदार नेते श्री. ब. ताम्हसकर यांना मजुरांनी त्यांना न्याय मिळवून मिळवून देण्याची विनंती केली. त्याप्रमाणे श्री. ताम्हसकरांनी त्यांच्या अन्यायास वाचा फोडण्याचे फार मोठे काम केले आहे, नसता ते कायमचे उपेक्षितच राहिले असते.

त्यांच्या मुख्य मागण्या—(१) त्यांना इतर नोकरांप्रमाणे कायम करावे व नोकरीचे फायदे द्यावे. (२) सरकारी मजुरीचा मान्य दर सध्या ११– रु. रोज आहे तो त्यांना मागील भरपाईसह मिळावा.

आपल्या मागण्यांची दखल घेतली जावी म्हणून सर्व मजुरांनी निवेदने देऊन, त्याचा उपयोग होत नाही असे बघून, २०–९–८२ पासून 'काम बंद आंदोलन' आरंभिले.

त्यालाही प्रतिसाद न मिळाल्याने दिनांक २७-१०-८२ ते ३-११-८२ आमरण उपोषण चार श्रमिकांनी अवलंबिले. त्यात एक स्त्री मजूर होती. त्यांची प्रकृती खालावल्यामुळे पोलिसांनी त्यांना दवाखान्यात दाखल केले व श्री. ताम्हसकरांच्या गैरहजेरीत दबाव आणून उपोषण सोडावयास भाग पाडले.

श्री ताम्हसकरांनी पुन्हा त्यांची भेट घेतली असता सर्व मजुरांनी दुर्दैवी कहाणी सांगून न्याय मिळवून देण्याकरिता ताम्हसकरांच्या मागे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

दि. ११–१०–८२ ला श्री ब. ल. ताम्हसकर गोळेगावहून पायी दीडशे स्त्री-पुरुष मजुरांची दिंडी घेऊन, ६६ किलोमीटरचे अंतर चालत परभणीस पोहोचले. तेथील कार्यकर्त्यांची त्यांना उत्स्फूर्त साथ मिळून, दिंडीस भव्य मिरवणुकीचे स्वरूप आले.

परभणीच्या कलेक्टर सौ. सुधा भावे ह्यांची त्यांनी भेट घेऊन. सर्व परिस्थितीची त्यांना जाणीव करून दिली. स्त्री मजुरांच्या हकीकती ऐकून सौ. भावेंनाही गहिंवर आला व त्यांनी त्यांच्या मागण्या मंजूर करण्याकरिता तावडतोब हालचाल सुरू केली.

त्यांच्या आश्वासनाने समाधान पावून मोर्चा कृषी विद्यापीठाच्या उपकुलगुरूकडे गेला. त्यांनी मोर्चातल्या लोकांना भेटण्यासही नकार दिला. हे पाहून मजूरही रागावले व त्यांनी त्यांच्या ऑफिसला घेराओ घातला. हां हां म्हणता कृषी विद्यापीठातील इतर मजुरांस ही बातमी समजली व ते सर्व पाच सहा मजूर गोळेगावच्या मजुरांना सहानुभूतीसाठी घेराओत सामील झाले. हा घेराओ दुसऱ्या दिवसापर्यन्त होता. उपकुलगुरूंनी कार्यकर्त्यांची क्षमा मागितल्यावर घेराओ उठविण्यात आला.

एवढे सर्व मजूर एकत्र येऊनही, सर्व आंदोलन अहिंसेवर श्रद्धा ठेवून चालले होते. कोणतीही शिवीगाळ केली नाही किंवा नुकसान करण्याचा प्रयत्न केला नाही. एवढा शांततामय मोर्चा परभणीतील लोकांनी प्रथमच पाहिला. कृषी विद्यापीठाच्या शेतमजुरांनी गोळेगावच्या मजुरांना भाकरी पुरवली व वर्गणी करून दुसरे दिवशी त्यांच्या घरी परत पाठविले.

सरकारी पातळीवर गोळेगावच्या मजुरांना न्याय देण्याचे यत्न चालू आहेत. ते लवकर व्हावेत हीच इच्छा. त्यांचे गाऱ्हाणे शांततापूर्ण मार्गाने सर्वांच्या कानावर टाकण्याचे कार्य श्री ब. ल. ताम्हसकर ह्यांनी कुशलतेने केले आहे. त्यांचे मित्र श्री ॲड. विजय गव्हाणे व ॲड. प्रदीप बांगर ह्यांची त्यांना परभणीस मदत झाली.

लाल गटाचे स्वार्थी कार्य गोळेगावहून समाप्त झाले आहे. त्यांचे कार्यकर्ते आझाद व लेबर ऑफिसचा इतके वर्षांचा नाकर्तेपणा मात्र आश्चर्यकारक आहे ! ◎ ◎

## कवी करंडक—उपक्रम गायनाचा

कवी वसंत बापट यांच्या एकसष्ठीनिमित्त सांताक्रूझ येथील साने गुरुजी आरोग्य मंदिराने 'आंतरशालेय समूह गीत गायन स्पर्धा' घेतल्या आहेत. श्री. वसंत बापट यांच्या प्रसिद्ध झालेल्या 'शिंग फुंकले रणीं' ह्या पुस्तकातील क्रमांक १५ ते ४५ ह्या गाण्यांपैकी एक गाणे तीस विद्यार्थ्यांनी समूहाने गायचे आहे. ह्या उपक्रमात मुंबईतील एकूण ४५ माध्यमिक शाळांनी भाग घेतला असून त्यात इंग्रजी, गुजराती, कानडी माध्यमाच्या शाळाही सहभागी झाल्या आहेत. ह्या ४५ शाळांचे सात विभाग पाडण्यात आले असून अंतिम स्पर्धेसाठी प्रत्येकी एक शाळा निवडण्यात येईल. अंतिम स्पर्धा साने गुरुजींच्या जन्मदिवशी म्हणजे २४ डिसेंबर रोजी दादरच्या साने गुरुजी विद्यालयात घेण्यात येणार आहे. पहिला क्रमांक मिळविणाऱ्या शाळेला रु. ५०० आणि 'वसंत बापट गीत गौरव करंडक' देण्यात येणार असून दुसऱ्या क्रमांकाला रु. ३०० आणि तिसऱ्या क्रमांकास रु. २०० देण्यात येणार आहेत. अंतिम स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या प्रत्येक समूहाला रु. १०० देण्यात येतील. 'वसंत बापट गीत गौरव करंडक' हा फिरता राहणार असून दर वर्षी अशा स्वरूपाची स्पर्धा घेण्यात येणार आहे.

— लीलाधर हेगडे